PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 8, ISSUE 2

# स्वयं प्रेरणेचा प्रणेता : प्राचीन भारतीय इतिहासातील घटनेचा सूक्ष्म मागोवा

**डॉ. विनय भोळे**
माजी प्राचार्य,
प्राध्यापक - मॉडेल कॉलेज ऑटोनॉमस, डोंबिवली.
**महाराष्ट्र भारत**

वैदिक संस्कृतीत धन्युष्यबाण हे सर्वोत्कृष्ट आणि सर्वश्रेष्ठ शस्त्र समजलं जात असे. कोणाही राजाच्या राज्याभिषेकात त्याला खांद्यावर धनुष्यबाण धारण करणे आवश्यक असे. भगवान शिव धनुर्विद्येतील सर्वश्रेष्ठ प्रतीक मानलं जाई. धनुर्विद्या शिकण्यासाठी जीवाचं रान करणारा एकलव्य निषाद म्हणजे रानावनात राहणारा व नागरी संस्कृतीपासून दूर असलेला वन्य रहिवासी होता. तो लहानपणापासून सर्वोत्तम धनुर्धर होण्याचं स्वप्न पाहत होता. अशी गोष्ट आपण शालेय जीवनात शिकतो आणि विशेष म्हणजे त्या गोष्टीचा संबंध पुढे कधी कुठे येत नाही.

अनेक कथा आणि गोष्टी आपण लहानपणी शिकतो आणि पुढे अनेक दशकं त्या अंतर्मनात राहून त्या इतक्या सत्य वाटायला लागतात की आपण एखाद्या परिस्थितीच्या बाजूने किंवा विरोधात विचार करायला लागतो. त्यालाच पूर्वग्रहदूषित विचार (Biased Thinking) म्हणतात. पुराण कथांबाबत असंच काहीसं आहे. सगळ्याच गोष्टींकडे आणि विशेषतः आपल्या धर्म आणि संस्कारांबाबत दुर्लक्ष करण्याची भारतीय मनोवृत्ती पुढील काळात घातक ठरणारी आहे.

आजच्या राजकारणाबाबत देखील लोकांची अशीच मतं आहेत. एखादा नेता आवडला की त्याने काहीही अयोग्य केलं तरी ते कसं बरोबर आहे हे पटवून देण्याची सुपारी आपल्याला आणि फक्त आपल्यालाच दिली आहे असे लोक वागतात. तसेच एखादा नेता नाही आवडला की त्याने काहीही आणि कितीही चांगलं काम केलं तरीही तो वाईटच.

हुशार नेता नेहमीच लोकांच्या या सार्वत्रिक मूर्खपणाचा फायदा घेत असतो, त्याला माहिती असतं, दुनिया झुकती है, सिर्फ झुकानेवाला चाहिये. एकलव्याबाबत देखील असाच एकांगी विचार झाला आहे. महान धनुर्धर असलेल्या एकलव्याच्या अनेक गुणांचा विचार न करता त्याला एका छोट्याश्या गोष्टीत जखडून ठेवलं गेलं आहे.

महाभारतातील कथेनुसार प्रयाग (अलाहाबाद) पासून सुदूर पर्यंत गंगाकिनारी शृंगवेरपूर हे राज्य पसरलेलं होतं. त्याचा राजा निषादराज हिरण्यधनु व त्याची पत्नी सुलेखा यांचा पुत्र अभिद्युन्म उर्फ अभय हा लहानपानापासूनच धनुर्धर होण्याचं स्वप्न पाहत होता. हिरण्यधनु हा श्रीकृष्णाच्या काकांचा पुत्र होता व तो निषादराजाला दत्तक दिला होता अशीही एक कथा आहे.

स्वतः अत्यंत सक्षम असलेला हिरण्यधनु, अमात्य व मंत्री यांच्या सल्ल्याने लोकशाही पद्धतीने राज्य करत होता. त्याचा सेनापती गिरिबीर अत्यंत शूर व मुत्सद्दी होता. अभिद्युन्म आठ वर्षांचा झाला आणि हिरण्यधनुने अभिद्युन्मला गुरुकुलात शिक्षण घेण्यास पाठवले. त्याच्या गुरूंनी त्याची एकाग्रता पाहून त्याला एकलव्य नाव दिलं. शृंगवेरपूर हे मगध, हस्तिनापूर, मथुरा, चेदी, चंदेरी या तत्कालीन राज्यांच्या बरोबरीचं राज्य होतं. अभिद्युन्मची एकतानता आणि एकाग्रता पाहून तो उत्तम धनुर्धर होईल हे जाणून पुलक ऋषींनी त्याला द्रोणाचार्यांकडे पाठवलं.

काही अभ्यासकांच्या मते द्रोणाने त्याला, मला वेळ नाही, तू तुझा स्वतःचा अभ्यास कर असं सांगितलं आणि तो आशीर्वाद समजून एकलव्याने अत्यंत श्रमाने धनुर्विद्या आत्मसात केली. असाही विचार करता येतो, की भीष्माने द्रोणाला कौरव आणि पांडव यांना शिकवण्यासाठी नेमलं होतं. त्यामुळे त्याला एकलव्याला शिकवणं शक्य नव्हतं आणि तिसरी प्रचलित गोष्ट म्हणजे तो आदिवासी असल्याने त्याला युद्धकौशल्य शिकवणं त्याने टाळलं.

परंतु, द्रोण व त्याचा गुरु परशुराम क्षत्रिय नव्हते आणि यज्ञयाग न करता द्रोणाबरोबर त्याचा मेव्हणा कृपाचार्य देखील एक उत्तम योद्धा होता तसेच द्रोणपुत्र अश्वत्थामा देखील एक अजोड योद्धा होता. त्यामुळे याचा वर्णव्यवस्थेशी संबंध जोडणं तितकंसं पटणारं नाही. खरं तर एकलव्य देखील राजाचाच मुलगा होता. आपला विषय एकलव्याचं चरित्र अभ्यासणं नसून त्याच्या गुणांचं व्यवस्थापनदृष्ट्या विश्लेषण करणं हे आहे.

एकलव्य द्रोणाचार्यांच्या आश्रमात राहिला व तो सेवक म्हणून काम करत होता. तिथे फक्त कौरव आणि पांडव शिकत होते. एके दिवशी शिक्षणाचा तास लवकर पूर्ण झाला आणि कौरव पांडव परत निघाले तेव्हा एकलव्याला सराव करताना दुर्योधनानं पाहीलं आणि ते द्रोणाचार्यांना सांगितलं. द्रोण भीष्माने नेमलेला शिक्षक होता. त्याला कौरव पांडव यांच्याशिवाय कोणालाही शिकवण्याची परवानगीच नव्हती. त्याने एकलव्याला परत जायला सांगितलं आणि स्वतःच्याच पद्धतीनं सर्व शिक्षण सराव करून पूर्ण करायला सांगितलं.

एकलव्य परत आपल्या राज्यात न जाता आदिवासी वस्तीत राहिला, त्याने द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा तयार केला आणि तो सराव करत राहिला.

एके दिवशी पांडव वनात विहार करत असता त्यांच्या कुत्र्याचं भुंकणं ऐकून एकलव्याने बाण सोडले, ते बाण कुत्र्याच्या मुखात जाऊन विसावले. कुत्र्याचं भुंकणं थांबलं पण कुठेही जखम झाली नव्हती. अर्जुनाच्या मनात ते कौशल्य पाहून असूया निर्माण झाली. त्याने तो कुत्रा द्रोणाला दाखवला आणि म्हणाला, गुरुवर्य तुम्ही मला जगातील सर्वश्रेष्ठ धनुर्धर करणार होतात, हा कोणीतरी माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे कारण अशा प्रकारे बाण मारणं मला येत नाही.

आश्चर्यचकित होऊन द्रोण सगळ्याचा शोध घेण्यास वनात गेला. त्याला त्याचाच पुतळा आणि समोर सराव करणारा एकलव्य दिसला. द्रोणाला पाहून तो अतिशय आनंदी झाला.

द्रोणाने त्याला विचारलं, तुझा गुरु कोण? त्यावर एकलव्य म्हणाला, गुरुदेव स्वतः आपण. त्यावर द्रोणानं त्याला गुरुदक्षिणा म्हणून उजव्या हाताचा अंगठा मागितला. एकलव्याने लगेच अंगठा कापून द्रोणाच्या चरणावर ठेवला. अर्जुन द्रोणाचं क्रौर्य पाहून चमकला पण त्याला द्रोण म्हणाला, 'हे पाप मी तुझ्यासाठी केलं, सामाजिक स्थैर्य निर्माण होण्यासाठी मी हे केलं. मला

वैयक्तिक लाभ काय होणार आहे? येणाऱ्या पिढ्या याचा दोष तुला नाही तर मला देणार आहेत'.

एकलव्य उजव्या हाताचा अंगठा गमावल्यावर परत धनुष्यातून बाण सोडू शकणार नव्हता. तो या प्रसंगानंतर आपल्या राज्यात परत गेला. एकलव्य केवळ असामान्य होता. अफाट मेहनत आणि एकाग्रता यांच्या जोरावर त्याने परत चार बोटं असताना धनुर्विद्या आत्मसात केली.

योग्य वेळी एकलव्याचं सुणिता (सुनीता नाही) नावाच्या राजकन्येशी विवाह झाला. त्याला केतुमान नावाचा पुत्र झाला. एकलव्याचा पिता हिरण्यधनु मथुरेवर जरासंधानं केलेल्या आक्रमणात सेनापती होता. एकलव्य आणि श्रीकृष्ण युद्धाचे संदर्भ विष्णू पुराण आणि हरिवंश पुराण यात सापडतात. जरासंधाचं सैन्य व यादव सैन्य जेव्हा समोरासमोर आलं तेव्हा अनेक योध्यांना यमसदनास पाठवणारा चार बोटांनी अचूक बाण सोडणारा एकलव्य श्रीकृष्णानं बरोबर हेरला. श्रीकृष्ण आणि एकलव्य युद्धात, विलक्षण शौर्य आणि युद्ध शास्त्राचं ज्ञान असलेल्या श्रीकृष्णाच्या हाती एकलव्य मारला गेला.

पुढे एकलव्याचा पुत्र केतुमान त्याच्या जागेवर शृंगवेरपूरचा राजा झाला आणि महाभारत युद्धात लढताना भीमाच्या हाती मारला गेला असे संदर्भही महाभारतात सापडतात.

कथा काहीही असली आणि त्याला कोणी काहीहि रंग दिला तरीही एकलव्याच्या कथेतून महाभारतातील विलक्षण प्रसंगाची प्रचिती येते. अत्यंत गुणवान एकलव्य ज्याच्या नावाने आजही क्रीडा पुरस्कार दिले जातात त्याला एक गरीब आदिवासी दाखवून आजही दृक्श्राव्य माध्यमांनी त्याच्यावर टीका केली दिसते.

शर्यतीत जर कोणाला प्रथम यायचं असेल तर आणि आपल्यापेक्षा जर कोणी श्रेष्ठ असेल तर आपला दर्जा वाढवण्यापेक्षा वर असलेल्याला खाली ओढणं हा प्रकार आपल्याला द्रोणाच्या वागण्यात दिसतो. द्रोण भीष्माचा सेवक होता, पगारी सेवक होता. त्याला अर्जुनाला सर्वश्रेष्ठ होण्यासाठी हे पाप करावं लागलं. सगळ्यात मोठं दुर्दैव असं की महाभारत युद्धात द्रोणाला त्याच्या सर्वात प्रिय शिष्य अर्जुनाबरोबरच युद्ध करावं लागलं.

एकलव्य महाभारत युद्धात अर्जुनाला नक्कीच भारी पडेल याची जाणीव झाल्यावर श्रीकृष्णानं त्याला अगोदरच ठार मारलं. महाभारत जगातील अद्भुत आणि विस्मयकारक ग्रंथ त्याचसाठी मनाला जातो. प्रत्येक पात्र आपलं कार्य करत जातं, आपल्याला वाचताना सगळेच बरोबर वाटतात. शेवटी धर्म आणि अधर्म जवळ करणाऱ्या अशा दोन गटांना आपण आपलं मत चिकटवून आपला निर्णय ठरवतो.

व्यवस्थापनाचा विचार केला द्रोणाचा मातीचा पुतळा एकलव्यासाठी प्रोत्साहन (motivation) देणारा ठरला. द्रोणाचा लौकिक इतका होता की तो पुतळा एकलव्याला शिकण्यासाठी एक माध्यम ठरला. पण, एकलव्याची निष्ठा (Allegiance), गुरुभक्ती (Devoutness towards Guru), ध्येयासक्ती (Goal orientedness), एकाग्रता (Concentration) आणि सर्वात म्हणजे सर्वोत्कृष्ट धनुर्धर होण्याची दुर्दम्य इच्छा (Burning Desire) वादातीत होती. उत्तम धनुर्धर असलेल्या निषादराजाच्या या पुत्राने जगाला आठवण करून दिली की, कोकिळा आपली अंडी कावळ्याच्या घरट्यात घालते; त्या अंड्यातून निघालेली कोकिळेची पिल्लं कावळ्यांच्या संगतीत राहिली, वाढली तरीही योग्य वेळी ती काव काव न करता सप्तसुरांच्या ताना मारतातच. उत्तम ध्येय असलेल्याला कोणी थांबवू शकत नाही.

त्याने कोणत्याही माध्यमाला गुरुस्थानी ठेऊन ज्ञान प्राप्त करता येतं हे जगाला दाखवून दिलं. स्वयंप्रेरणा (Self-Motivation) माणसाला सर्वोत्कृष्ट ठरवू शकते हा संदेश त्याने विश्वाला दिला. गुरु उपलब्ध नसेल तरीही ज्ञानसाधना (Self-Study) करता येते आणि अंगठा कापून घेण्यासारखे अडथळे (Obstacles on the way to Objectives) आले तरीही सर्वोत्कृष्ट हा सर्वोत्कृष्टच असतो. ज्याच्यामुळे अर्जुनाला असूया वाटली, ज्याच्या काळजीने द्रोणाचार्यांना पाप करावं लागलं, भगवान श्रीकृष्णाला ज्याच्या शौर्य आणि गुणवत्तेची काळजी वाटून स्वतः ज्याच्याशी युद्ध करावं लागलं त्या निषादपुत्र एकलव्यास स्वयंप्रेरणेचा आद्य प्रणेता म्हणून सादर प्रणाम.

# संदर्भ:

१. प्राचीन चरित्रकोश - म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, भारतीय चरित्रकोश मंडळ, शिवाजीनगर, पुणे- ४, १९६४.

२. महाभारताची चिकित्सक आवृत्ती खंड १ ते २२- भांडारकर प्राच्यविद्या संस्था, भांडारकर मार्ग, पुणे - ४.

३. महाभारताची गूढ रहस्ये : कवीश्वर ३४, जानकीनगर, इंदोर (मध्य प्रदेश )- ४५२००१.

४. महाभारताचा उपसंहार : ले. भारताचार्य चिं. वि. वैद्य - वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११ ०१६.

५. श्रीकृष्णचरित्र: ले. भारताचार्य चिं. वि. वैद्य - वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११ ०१६.

६. महाभारत : संपादन - प्रा. न. र. फाटक

७. महाभारत : संपादन - प्रा. भालबा केळकर

८. व्यासपर्व : दुर्गा भागवत, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई - ४, आवृत्ती १९६२.

९. गर्गसंहिता - भांडारकर इन्स्टिटयूट - पुणे - ४.

१०. हरीवरदा : श्रीकृष्ण कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३, शनिवार पेठ, पुणे- ४११०३०.